दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
▶ RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com
lakshamaha.dhule@gmail.com
lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २५७ वा ▶ गुरुवार दि. १३ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## भाजपला सळो की पळो करून सोडणार : पटोले यांचा इशारा

**मुंबई ।** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर लावण्यात आलेले आरोप खोटे आणि चुकीचे आहेत. या आरोपांमागे भाजपचा हात आहे. राहुल गांधी यांनी कोणताही गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला



नसताना केवळ राजकीय द्वेषातून त्यांच्यावर कारवाई करत खासदारकी रद्द केली आणि नंतर त्यांना बेघर करण्यात आले. जनतेची भावना संसदेत मांडणाऱ्या निरपराध राहुल गांधी यांच्यावरील अन्यायाविरोधात आम्ही मौन सत्याग्रह आंदोलन केले.भाजपचा राज्यभर भांडाफोड करून त्यांना सळो की पळो करुन सोडू, असा असा इशारा दिला.

## न्यूज कॉलम

### जाब विचारणाऱ्या मामास मारहाण

**धुळे ।** तालुक्यातील गरताड गावात मामाने भाचीस तुला कोणी त्रास दिला, असे विचारल्याचा राग आलेल्या चौघांनी लाकडी दांडक्यासह हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि.१० जुलै रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. भाचीस तुला कोणी त्रास दिला असे विचारल्याचा राग आल्याने राजु साहेबराव बैसाणे, शिवाजी राजु बैसाणे, माधवराव पौलाद खंडागळे, ज्ञानेश्वर संजय बैसाणे यांनी मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. यात शिवाजी बैसाणे याने त्याच्या हातातील लाकडी दांडक्याने मारहाण केली.

### देगाव येथे वीजपंपावर चोरट्यांचा डल्ला

**धुळे ।** शिंदखेडा तालुक्यातील देगाव येथील सुमारे साडेबारा हजार रुपये किमतीचा वीजपंप चोरट्यांनी शनिवारी रात्री चोरून नेला. देगाव येथील शेतकरी धनसिंग कद्रू पाटील (वय ६६) शनिवारीसकाळी सातच्या सुमारास मुलगा समाधान पाटील, असे गायीचे दूध काढण्यासाठी गावशिवरातीलशेतात गेले असता पत्राची शेड येथे ठेवलेला वीजपंप दिसला नाही.

# खातेवाटपाचा तिढा जैसे थे!

## अजित पवारांचा गट अर्थ, महसूलवर ठाम

### पवार दिल्लीला रवाना, शिंदे - फडणवीसही जाणार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र मंत्रिमंडळ विस्ताराच्या हालचाली सुरू आहेत. तर, दुसरीकडे अद्यापही खातेवाटपाचा तिढा कायम आहे. राज्याचे नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या ९ आमदारांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. मात्र, खातेवाटप जाहीर झाले नसल्याने चर्चांना उधाण आले आहे. अशा स्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आता दिल्लीत धाव घेतली आहे. खातेवाटपावर भाजप श्रेष्ठींसोबत चर्चेची शक्यता आहे. अजित पवार यांच्यासोबत प्रफुल्ल पटेल हे देखील दिल्ली दौऱ्यात आहेत, अशी चर्चा आहे.

मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात सोमवारी मध्यरात्री २ वाजेपर्यंत बैठक झाली. पुन्हा मंगळवारी दुपारी अजित पवार यांनी फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीगाठींमधूनही खातेवाटपावर सहमती होऊ शकलेली नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाच्या एन्ट्रीने शिवसेना-भाजप खातेवाटपाची समीकरणं बिघडली आहेत. जी खाती शिवसेना-भाजपकडे जाणार होती, त्यापैकी ९ मंत्री आता राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेले आहेत. त्यामुळे शिवसेना आणि भाजपचा कोटा कमी झाला आहे. एकूण ४२ पैकी उरलेल्या १४ मंत्रिपदांमध्ये तीनही पक्षांना कसं सामावून घ्यायचं असा प्रश्न आहे.

राष्ट्रवादीचे सर्व ९ कॅबिनेट मंत्री आहेत. त्यामुळे राज्यमंत्रिपदाची अपेक्षा राष्ट्रवादीला असू शकते. दुसरीकडे भाजप आणि शिवसेनेचे आमदार आपलं मंत्रिपदाचा आकडा कमी झाल्यामुळे नाराज होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून शपथ घेतलेल्या मंत्र्यांमध्ये ज्येष्ठ नेत्यांचा समावेश आहे. त्यामुळे राष्ट्रवादीकडून महत्त्वाच्या खात्यांची मागणी केली जात आहे. तर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अर्थ खातं हवं असल्याची चर्चा आहे. अजित पवार हे अर्थ खात्यासाठी आग्रही असल्याची चर्चा आहे. अजित पवार यांना अर्थ खाते देण्यास शिवसेनेच्या आमदारांनी विरोध केला आहे. त्यामुळे खातेवाटपावरून तिढा वाढला असल्याची चर्चा आहे. उद्धव ठाकरे यांची साथ सोडत शिवसेनेत बंड करणाऱ्या आमदारांनी अजित पवार यांच्याकडून निधी वाटपात पक्षपाती केला जात असल्याचा आरोप केला होता. त्याशिवाय, तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत महाविकास आघाडी सरकारमध्ये निधी वाटपात राष्ट्रवादीकडे अधिक निधी कसा दिला जातोय याची आकेडवारी जारी केली होती.



### दिल्ली वारीत तिढा सुटणार?

उपमुख्यमंत्री अजित पवार हे दिल्लीत दाखल झाले आहेत. तर, दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईत आहेत. त्यामुळे या दोघांच्या अनुपस्थितीत भाजप श्रेष्ठींची भेट घेऊन खातेवाटपाचा तिढा सोडवणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### मॅरेथॉन बैठका निष्फळ

सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रथम मंत्रिमंडळ विस्तार करा आणि नंतर योग्यवेळी खातेवाटप करु, असा पवित्रा घेतला होता. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर खातेवाटपाची चर्चा सुरु झाली होती. त्यानुसार मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांत मॅरेथॉन बैठका झाल्या. पण खातेवाटपाचा तिढा अद्याप सुटला नाही.

### अजित पवार अर्थ, महसूल, जलसंपदासाठी आग्रही

अजित पवार यांचा गट महसूल, अर्थ व जलसंपदा या ३ खात्यांसाठी अडून बसला आहे. महसूल खाते सध्या राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे आहे. तर अर्थ व जलसंपदा ही दोन्ही खाती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहेत. शिंदे गटाच्या आमदारांचा अजित पवारांना अर्थखाते देण्यास ठाम विरोध आहे. या आमदारांनी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात बंड करताना तत्कालीन अर्थमंत्री अजित पवारांवर निधीवाटपात भेदभाव करत असल्याचा आरोप केला होता. आता पुन्हा हे खाते अजित पवारांकडे गेल्यास ते पूर्वीसारखाच व्यवहार करू शकतात, असा शिंदे गटाचा युक्तिवाद आहे.

### अजित पवार, शिंदे व फडणवीस दिल्लीला जाणार?

खातेवाटपाचा तिढा सुटलनसल्यो आता हा वाद दिल्लीत भाजपश्रेष्ठींच्या दरबारात सुटण्याची शक्यता आहे. त्यासाठी अजित पवार बुधवारी सायंकाळी दिल्लीला रवाना झाले. त्यांच्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही दिल्लीला जाणार आहेत. ते तिथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करून या मुद्यावर तोडगा काढतील, असा अंदाज आहे.

# ज्यांच्यावर ३०२ चे गुन्हे, त्यांना बाहेर काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांचं डील

### संजय राऊतांचा सनसनाटी आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातल्या अनेक तुरुंगातल्या खतरनाक गुन्हेगारांशी मुख्यमंत्री कार्यालयातून संपर्क साधला जातोय. ज्यांच्यावर ३०२ सारखे गंभीर गुन्हे आहेत, त्यांना बाहेर काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून डील सुरु आहे. २०२४ च्या निवडणुकीआधी त्यांना जामिनावर सोडण्याचं षडयंत्र रचलं जात आहे, असा सनसनाटी आरोप करुन लवकरच मी यासंबंधीचे पुरावे जाहीर करेन, असं शिवसेना खासदार संजय राऊत म्हणाले.

कलंक या शब्दावरुन भाजप उद्धव ठाकरे यांच्यावर करत असलेल्या टीकेला राऊतांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं. फडणवीसांचे ज्या पद्धतीने राजकारण सुरु आहे, ते एकप्रकारे कलंकच आहे, असा पुनरुच्चार राऊत यांनी केला. त्याचवेळी तुरुंगात असलेले गुन्हेगार आणि मुख्यमंत्र्यांच्या कथित डीलवरुन राऊतांनी गंभीर आरोप केला. संजय राऊत म्हणाले, निवडणुकांपूर्वी महाराष्ट्रातील अनेक तुरुंगात असलेल्या गंभीर गुन्हेगारांना मुख्यमंत्री कार्यालयातून संपर्क केला जात आहे. निवडणुकांपूर्वी



त्यांना जामिनावर सोडण्यासाठी सीएमओमधील माणसं त्यांना जाऊन भेटत आहेत. मुख्यमंत्री कार्यालयाचं गुन्हेगारांबरोबर डीलिंग सुरु असताना गृहमंत्री फडणवीस काय करत आहेत? असा सवाल संजय राऊत यांनी विचारला.मुख्यमंत्री कार्यालयातून कसे फोन जातायेत? कुणाला कुठं भेटायला पाठवलं जातंय? कुठे बैठका होतायेत? अगदी तुरुंगाच्या दारात, आतमध्ये... आतमध्येही फोन आहेत.

कलंक या शब्दाचा फडणवीसांना राग आला, पण त्यांनी न रागावता आमच्या प्रश्नांची उत्तरे द्यायला हवीत. तुम्ही आमचं काय वाकडं करणार आहात, जे काही करायचं ते करुन झालंय. आपण घटनात्मक पदावर बसलेला आहात, तुम्ही आमच्या प्रश्नांना उत्तरे दिलीच पाहिजे. आमने सामने येऊन लढा, आम्ही जे सांगतोय ते महाराष्ट्राच्या हितासाठी सांगतोय. महाराष्ट्राचा कलंक पुसला जावा म्हणून सांगतोय. तुमच्या गृहखात्याचा नाकावर टिच्चून काय चाललंय? हे लवकरच मी उघड करतो, असा इशाराही संजय राऊत यांनी फडणवीस यांना दिला.

# 'एक सही संतापाची' मनसेची स्वाक्षरी मोहीम



**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील पारोळारोडवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे 'एक सही संतापाची' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमास नागरिकांनी भरभरून प्रतिसाद देत आपल्या मनातील खदखद मनसेच्या फलकावर स्वाक्षरीच्या रुपात व्यक्त केली.

महाराष्ट्रातील राजकारणाचा झालेला चिखल लक्षात घेता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यभरात 'एक सही संतापाची' उपक्रम राबविण्याचे आदेश पदाधिकार्यांसह कार्यकर्त्यांना दिले आहेत. त्यानुसार धुळे शहरात मनसे पदाधिकार्यांनी 'एक सही संतापाची' उपक्रम पारोळा रस्त्यावर राबविला. यात 'एक सही संतापाची'या मथळ्याखाली एका बॅनरवर मतदानाच्या बोटावर, राजकारणाचा चिखल झाला आहे का? एकदा मतदान केलं की तुम्हाला पाच वर्षे गृहित धरणार?, माझ्या मताला काही किंमत नाही का?, या घटनांचा तुम्हाला राग येत नाही का? चिड येत नाही का? संताप येत नाही का? जर येत असेल तर उपक्रमात सहभागी होऊन स्वाक्षरी करा, असे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिल्याचे यावेळी दिसून आले. दरम्यान, प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मनसे महानगर प्रमुख यांनी ज्या-ज्या ठिकाणी 'एक सही संतापाची' उपक्रम सुरू असेल त्या-त्या ठिकाणी नागरिकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही केले आहे. यावेळी महाराष्ट्र प्रदेश सचिव प्राचीताई कुळकर्णी, जिल्हाध्यक्ष ॲड.दुष्यंतराजे देशमुख, डॉ.मनिष जाखेटे, शहर उपाध्यक्ष रविराज जोशी, जिल्हा सचिव अजित राजपूत, शहर अध्यक्ष बंटीबाबा सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष संध्या पाटील, धुळे तालुका अध्यक्ष संतोष मिस्तरी, उपाध्यक्ष जयेश भदाणे, विभाग अध्यक्ष सतिष पाटील, योगेश सैंदाणे, विभाग अध्यक्ष पराग पितृभक्त, अमृत पाटील, आकाश माळी, पुष्पक माळी, गणेश जाधव, भूषण शेलार, विद्यार्थी सेना शहर उपाध्यक्षओम कासार यांची उपस्थिती होती.

# वाको राष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप मध्ये अश्विनी व विन्स रौप्य पदकांसह चमकले



**मुंबई । प्रतिनिधी**

वाको सीनियर आणि मास्टर्स नॅशनल किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धा लव्हली विद्यापीठ, फगवारा, पंजाब येथे आयोजित करण्यात आली होती.

स्पोर्ट्स किकबॉक्सिंग असोसिएशन मुंबई शहर चे अध्यक्ष व प्रशिक्षक उमेश जी मुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना अश्विनी जांबळे आणि विन्स पाटील यांनी लाईट कॉन्टॅक्ट प्रकारात दोन रौप्य पदके मिळवून त्यांचे अपवादात्मक कौशल्य आणि दृढनिश्चय दाखवला. त्यांनी त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीने महाराष्ट्राला गौरव संपादन करून दिला. उमेश मुरकर आणि विघ्नेश मुरकर यांच्या तज्ज्ञ प्रशिक्षणाखाली, या प्रतिभावान खेळाडूंनी त्यांच्या अविचल मनोवृत्तीचे प्रदर्शन केले आणि प्रशंसनीय विजय मिळवून त्यांना त्यांच्या श्रेणीतील शीर्ष स्पर्धकांमध्ये स्थान मिळविले. विशेष म्हणजे, या राष्ट्रीय स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पंच विघ्नेश मुरकर यांनी रिंग रेफ्री म्हणून निष्पक्षता राखण्यात आणि खेळाची भावना टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. रोशन शेट्टी आणि आशिष महाडिक यांनी संपूर्ण स्पर्धेत अपवादात्मक कौशल्य आणि दृढनिश्चय दाखवला. तरीही, त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीने प्रेषकांवर अमिट छाप सोडली, त्यांच्या प्रतिभा आणि खिलाडूवृत्तीच्या प्रभावी प्रदर्शनासाठी त्यांना प्रशंसा मिळाली. त्यांची उल्लेखनीय कामगिरी महत्त्वाकांक्षी खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरते आणि क्रीडा उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून मुंबईचा दर्जा अधिक मजबूत करते.

# मध्य प्रदेशातील तरुणांकडून पळासनेर येथे शस्त्रसाठा जप्त

### ठाणे पोलिसांची कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**

मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा नेणाऱ्या तरुणाला ठाणे येथील पोलीस पथकाने अटक केली. त्याच्याकडून २० गावठी बनावटीचे पिस्तूल, एक गावठी बनावटीची मशिनगन, २ मॅग्झीनसह २८० जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. आणखी गुन्हें उघडकीस येण्याची शक्यता आहे. मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा घेऊन पळासनेर (ता. शिरपूर) येथे संशयित येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर ठाणे येथील गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांच्यासह ठाणे येथील पोलीस पथक आरोपीचा शोध घेणेकामी पळासनेर येथे आले.

पोलीसांनी सापळा रचत बुधवारी (ता.११) रात्री संशयीताला पकडले. त्याच्याकडून एकुण २० गावठी बनावटीचे पिस्तूल, एक



गावठी बनावटीची मशिनगन, २ मॅग्झीनसह २८० जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. ठाणे (मुंबई) येथील वागळे इस्टेट पोलीस ठाणे येथेही गुन्हे दाखल असलेला आरोपी सुरजीतसिंग उर्फ माजा आवसिंग (वय २७ रा. मु.उमर्टीगाव पो. बलवाडी ता. वरला जि. बडवानी, मध्यप्रदेश) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीअंती हा मोठा शस्त्रसाठा विक्रीसाठी नेण्यात येत असल्याचे आढळले. शस्त्रसाठा नेण्यापूर्वीच त्यास सापळा रचुन शिताफिने पकडले. अग्निशस्त्र व जिवंत काडतुस असा साठा जप्त करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त जयजित सिंग, पोलीस सहआयुक्त दत्तात्रय कराळे, अपर पोलीस आयुक्त गुन्हे पंजाबराव उगले, पोलीस उपायुक्त गुन्हे (अतिरिक्त कार्यभार) राजेंद्रकुमार दाभाडे, पोलीस उपायुक्त गुन्हे शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध १) निलेश सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली वागळे युनिट ५, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके, सहाय्यक निरीक्षक भुषण शिंदे, अविनाश महाजन, उपनिरीक्षक सुनिल अहिरे, हवालदार संदिप शिंदे, रोहीदास रावते, सुनिल निकम, शशिकांत नागपुरे, विजय पाटील, माधव वाघचौरे, सुनिल रावते, विजय काटकर, अजय साबळे, महिला हवालदार सुनिता गिते, मिनाक्षी मोहिते, उत्तम शेळके, तेजस ठाणेकर, यश यादव, आदींनी कारवाई केली.

# सप्तश्रृंगीच्या घाटात एसटीचा अपघात, बस थेट ४०० फूट दरीत कोसळली

### एका प्रवाशाचा मृत्यू, २० जखमी

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील वणी येथील सप्तशृंगी गड घाटात एसटी बस दरीत कोसळल्याने भीषण अपघात घडला आहे. सदर अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून २० हून अधिक जण जखमी झाले आहेत.

सदर घटनेची माहिती समजताच जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन अपघाताची पाहणी केली. त्यानंतर अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांची वणी येथील रुग्णालयात जाऊन भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

**जखमींच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होवो हीच आई सप्तश्रृंगी देवी चरणी प्रार्थना.**
**- दादा भुसे,**
पालकमंत्री,
नाशिक



याप्रसंगी स्थानिक पदाधिकारी देखील उपस्थित होते. दरम्यान, यावेळी दादा भुसे यांनी रुग्णालयातील डॉक्टरांकडून जखमींवर सुरु असलेल्या उपचारांची माहिती जाणून घेतली व त्यांच्यावर सर्वोत्तम वैद्यकीय उपचार करावेत असे आदेश जिल्हाधिकारी व जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले.

मिळालेल्या माहितीनुसार गेल्या दोन ते तीन दिवसांपूर्वी अमळनेर तालुक्यातील मुडी येथील महिला या नाशिक येथील वणी गडावर सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी एकत्र गेल्या होत्या.

यादरम्यान सप्तशृंगी देवीचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांच्या या बसला अपघात झाला. सप्तशृंगी गडाच्या घाटात गणपती टप्प्यावरुन बस दरीत कोसळली. या मुडी येथील महिला भाविक आशाबाई राजेंद्र पाटील यांचा मृत्यू झाला आहे. तर त्यांच्या सोबतच्या महिला ह्या जखमी झाल्या आहेत.

या बसमध्ये मूडी प्र. डांगरी येथील १४ प्रवासी होते. त्यातील आशाबाई राजेंद्र पाटील यांचा मृत्यू झाला असून मूडी येथील प्रमिलाबाई गुलाबराव बडगुजर, संजय बळीराम भोई, सुशिलाबाई सोनू बडगुजर, वच्छलाबाई साहेबराव पाटील, सुशीलाबाई बबन नाजन, विमलबाई भोई, प्रतिभा संजय भोई, जिजाबाई साहेबराव पाटील, संगीता मंगुलाल भोई, रत्नाबाई, सुरेखाबाई हिरालाल बडगुजर, संगीता बाबूलाल भोई, भारगोबाई माधवराव पाटील हे जखमी झाले आहेत.

### दहा लाखांची मदत; मुख्यमंत्री शिंदेंची माहिती

नाशिकमधील कळवण (नाशिक) येथे सप्तशृंगी गड घाटात एसटी बसच्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या महिलेच्या वारसाला दहा लाख रुपयांची मदत एसटी महामंडळामार्फत देण्यात येणार आहे. या अपघातातील जखमींवर शासकीय खर्चाने उपचार करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. खामगावआगाराची बस सप्तशृंगी गडावरून आज सकाळी खामगावच्या दिशेनं निघाली होती. त्यावेळी घाटातील गणपती टप्प्यावरुन बस थेट ४०० फुट दरीत कोसळली. बसमध्ये २२ प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे. गडावरील स्थानिक रहिवाशी आणि शासकीय यंत्रणांकडून मदतकार्य सुरू आहे. तर जखमी प्रवाशांना वणी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# 'तू आवडतेस, माझ्यासोबत लग्न कर' तरुणाकडून विवाहितेचा विनयभंग

**धुळे । प्रतिनिधी**

दराणे (ता. शिंदखेडा) येथे २२ वर्षीय विवाहितेचा विनयभंग केल्याची घटना घडली. याबाबत शिंदखेडा पोलिस ठाण्यात तरुण, त्याची आई, वडील व आजी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

दराणे (ता. शिंदखेडा) येथील घरकाम करणाऱ्या विवाहितेचा गावातील भय्या दिलीप ठाकरे सात- आठ दिवसांपासून शेताच्या रस्त्यावर भेटून 'तू खूप आवडस, तुनावर मनं प्रेम से, मना संग लगीन कर!' असे वारंवार बोलून पाठलाग करीत होता. त्याकडे वेळोवेळी दुर्लक्ष करून तेथून निघून जात होते. या प्रकाराबाबत घाबरून घरात पती, तसेच सासु-सासरे यांना काही सांगितले नव्हते. त्यानंतर मागील तीन ते चार दिवसांपासून घराबाहेर निघून कोठेही जात असताना भय्या ठाकरे जास्तच पाठलाग करीत असून, याबाबत गावात कोणास काही कळाले तर बदनामी होईल अशी भीती वाटत होती. दरम्यान सोमवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घराच्या पायऱ्यांवर बसलेले असताना पती तसेच सासू-सासऱ्यांनी भय्या ठाकरे याला जाब विचारला असता ठार करण्याची धमकी देत शिवीगाळ करून दमदाटी केली.

## ना ममता, ना समता; इथे कायम अशांतता

पश्चिम बंगाल एकेकाळी देशातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला असलेले राज्य म्हणून ओळख. काँग्रेसपासून फारकत घेत तृणमूल काँग्रेसची स्थापना करणाऱ्या ममत बॅनर्जी यांच्याकडे सध्या राज्याची धुरा आहे. महिला असतानाही एक आक्रमक चेहरा म्हणून त्यांना भारतीय राजकारणात स्थान असले तरी, गेल्या तीन-चार दिवस पश्चिम बंगालमध्ये स्थानिक पातळीवरील निवडणुकांमध्ये झालेल्या रक्तरंजित संघर्षाच्या वेळी ममतादीदी कुठे गायब झाल्या असे बोलण्याची वेळ आली. मणिपूर राज्यातील हिंसाचारावरून भाजपला कोंडीत पकडणारी काँग्रेस आता मूग गिळून का बसली आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. मतदानावेळी झालेला हिंसाचार पाहता निवडणुका शांततेत कशा पार पाडायच्या असा प्रश्न यापुढे निवडणूक आयोगाला पडणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी एक लिटमस टेस्ट म्हणून होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जर मतदान केंद्र ताब्यात घेऊन मतपेट्या पळविल्या जात असतील, तर यंत्रणेपुढे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. काही ठिकाणी गोळीबारही झाला, ज्यामध्ये निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला. ज्या बूथवर मतपेटी छेडछाड आणि हिंसाचाराच्या घटना घडल्या होत्या, अशा पुरुलिया, बीरभूम, जलपाईगुडी आणि दक्षिण २४ परगणा येथील मतदान केंद्रांवरील मतदान अमान्य कससससरत बंगाल राज्य निवडणूक आयोगाने तेथे पुन्हा मतदान प्रकिया राबविली. त्यानुसार येथील बूथवरच सोमवारी फेरमतदान घेण्यात आले. पश्चिम बंगालमधील ४ जिल्ह्यांतील ६९७ बूथवर सोमवारी पुन्हा पंचायत निवडणुकीसाठी मतदान झाले. ८ जुलै रोजी पंचायत निवडणुकीत ७३ हजार ८८७ ग्रामपंचायतींच्या जागांपैकी ६४,८७४ जागांसाठी मतदान झाले होते. उर्वरित ९,०१३ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले. बिनविरोध निवडून आलेले सर्वाधिक ८८७४ उमेदवार तृणमूल काँग्रेसचे आहेत. पंचायत निवडणुकीचा निकाल ११ जुलैला लागणार आहे. केंद्रीय दलाच्या तैनातीनंतरही राज्यात विविध भागांतून हिंसाचाराच्या बातम्या येत आहेत. त्याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येत होते. बूथ लुटणे, बॅलेट पेपर फाडणे, बॅलेट पेपर जाळण्याच्या घटना अनेक भागांतून पाहायला मिळाल्या. कूचबिहारच्या मठभंगा-एक ब्लॉकच्या हजरहत गावात एक तरुण मतपेटी घेऊन पळून गेला, तर दक्षिण २४ परगणा येथील भानगड ब्लॉकमधील जमीरगाची येथे टीएमसी कार्यकर्त्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात एक जण जखमी झाला, असे चित्रही पाहावयास मिळाले. निवडणुकीच्या दिवशी सहा जिल्ह्यांत सोळा जणांची हत्या झाली. त्यामुळे एका महिन्यात जीव गमावणाऱ्यांची संख्या ३५ वर गेली आहे. ८ जून रोजी निवडणुका जाहीर झाल्यापासून ७ जुलैपर्यंत १९ जणांना आपला जीव गमावला. राज्य निवडणूक आयोगाने ७ जून रोजीच संवेदनशील बूथची संख्या दिली. मात्र त्याचे ठिकाण किंवा अन्य कोणतीही माहिती देण्यात आलेली नसल्याने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे ५९ हजार सैन्य या ठिकाणी उपस्थित असताना, त्याचा योग्य वापर करता आला नाही, असे सीमा सुरक्षा दलाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. राज्य सरकारने अहवाल दिला होता की, फक्त ४ हजार ८३४ संवेदनशील बूथ आहेत. ज्यावर केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे जवान तैनात होते; परंतु प्रत्यक्षात त्याहून अधिक संवेदनशील पोलीस बूथ असल्याचे निदर्शनास आले आहे. स्थानिक प्रशासनाच्या मागणीवरूनच बीएसएफची तैनाती करण्यात आली होती. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या केंद्रीय सुरक्षा दलामध्ये सुसंवाद नसल्याची बाब पुढे आली. निवडणुकीदरम्यान गर्दीवर नियंत्रण ठेवणे ही जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आहे. बंगालमध्ये केंद्रीय दल वेळेत कंपन्या तैनात करू शकले नाहीत, असे बंगालचे निवडणूक आयुक्त राजीव सिन्हा यांचे म्हणणे आहे. पंचायत निवडणुकीदरम्यान झालेला हिंसाचार आणि हत्येच्या घटनांसाठी विरोधी पक्षनेते आणि नंदीग्रामचे भाजप आमदार शुभेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना जबाबदार धरले आहे. टीएमसीचे गुंड आणि पोलिसांच्या संगनमताने अनेक हत्या झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

# समृद्ध वेदपरंपरेला कृतज्ञतेचा नमस्कार



नाशिक येथील महर्षी गौतम- -गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान, दक्षिणाम्नायश्री श्री जगद्गुरु शंकराचार्य महासंस्थान शृंगेरी, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेकतर्फे राष्ट्रीय वेदशास्त्र महापरिषद आयोजित करण्यात आली आहे. दि.१३ जुलै रोजी पंचवटीत सरदार चौकातील गोपाल मंगल कार्यालयात दुपारी १२.३० वाजता महापरिषदेला प्रारंभ होईल. दि.१४ रोजी महापरिषदेचे उद्घाटन प्रो डॉ. हरेराम त्रिपाठी कुलगुरू, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक नागपूर यांच्या हस्ते होईल. गंगापूर रोडवरील शंकराचार्य न्यासाच्या डॉ. कूर्तकोटी सभागृहात वेदशास्त्र संस्कृत पुरस्कार प्रदान सोहळा होईल. त्या निमित्ताने समृद्ध वेदपरंपरेला कृतज्ञतेचा नमस्कार !

नाशिकच्या पुण्यभूमीत ही महापरिषद आयोजित करताना धन्यता वाटते आहे.

आज दि.१३ रोजी दुपारी १२.३० वाजता महापरिषदेचे उदघाट्न सत्र होईल. त्यानंतर वैदिक संहिता, जन संज्ञापन व संतांची वेदनिष्ठा या विषयावर परिसंवाद होणार आहे.

यामध्ये प्रा. हरेराम त्रिपाठी, वेदशास्त्र संपन्न गणेश्वरशास्त्री द्रविड गुरुजी, वेदांतरत्न प्रमोदशास्त्री कुलकर्णी, स्मार्त चुडामणी शांताराम भानोसे सहभागी होतील. ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर परिसंवादाचे संचालन करणार आहेत.

दि.१४ रोजी सायंकाळी ५ वाजता कूर्तकोटी सभागृहात होणाऱ्या पुरस्कार वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून दिल्लीच्या केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी उपस्थित रहाणार आहेत. त्यांच्या शुभहस्ते सन्मान वितरित होणार आहे. नाशिककरांनी दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित रहावे. ज्यांचे वेद परंपरा पुढे नेण्यात मोलाचे योगदान आहे अश्या विद्वानांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी अनेकांनी तन, मन, धनाने योगदान दिले आहे.

कै.भास्कर अण्णा जोशी स्मरणार्थ राष्ट्रीय वेदशास्त्र शिरोमणी पुरस्कार वाराणसीचे गणेश्वरशास्त्री द्रविड यांना प्रदान करण्यात येणार आहे. धर्मभूषण गौरीशंकर राष्ट्रीय ऋग्वेद पुरस्कार चेन्नईचे हरीहरन घनपाठी यांना नाशिकचे वेदाचार्य शांताराम भानोसे यांनाही यजुर्वेदामध्ये गौरीशंकर राष्ट्रीय वेद पुरस्कार, सामवेद पुरस्कार बंगळुरुचे मानव मिश्रा यांना,

अथर्ववेद पुरस्कार जालन्याचे दिनकर जोशी यांना प्रदान करण्यात येतील.

संस्कृत सेवाव्रती राष्ट्रीय पुरस्कार रामटेकचे मधुसूदन पेन्ना, नाशिकच्या वैशाली वैद्य यांना देण्यात येणार आहेत. वेदमूर्ती कै. नंदकुमार हरदास वेदवेदांग पुरस्कार नाशिकचे अभयशात्री पाठक

व वैदिक छात्र पुरस्कार नाशिकच्याच वेदमूर्ती सौरभ पाठक यांना देण्यात येतील. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्कारांचे स्वरूप आहे.

रामटेकच्या कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू मधुसूदन पेन्ना हे सुवर्णपदकाचे मानकरी आहेत. वेदांत तत्वज्ञान व योगशास्त्राचे बहुमूल्य संशोधन त्यांनी केले आहे. २ महाकाव्ये, १० लघुकाव्ये, ३० अनुवाद व १४० संपादीत ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहेत. गुलाबराव महाराजांवरील त्यांच्या महाकाव्याला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. देशभरातून विविध पुरस्कार त्यांना मिळाले असून परदेशात त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले आहे. बंगळुरूचे मानस मिश्रा हे सामवेद विद्वान म्हणून सुपरिचित आहेत. त्यांनी अहमदनगरच्या क्षीरसागर महाराज पाठशाळेत शिक्षण घेतले आहे. श्रृंगेरी, आंध्र प्रदेश येथे वेदशात्राचे उच्चशिक्षण त्यांनी घेतले असून विविध सभासंमेलनातील चर्चांमध्ये त्यांचा सहभाग असतो.



**वेदाचार्य रवींद्र पैठणे**
निमंत्रक, महापरिषद
संस्थापक प्रधानाचार्य
महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान,नाशिक.

जालन्याचे दिनकर जोशी यांचे कर्नाटकात दशग्रंथ अध्ययन झाले असून ते संस्कृत,अथर्ववेद व कर्मकांडाचे अध्यापन करतात. त्यांना सुवर्णपदकासह विविध पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत.

श्री समर्थ वेदविद्यालय व श्री दत्तधाम येथे ते अथर्ववेदाचे अध्यापन करतात. प्रमोदशास्त्री कुलकर्णी हे परभणीचे असून अद्वैत वेदांतशास्त्र, ऋग्वेद, न्याय, ज्योतिष, साहित्य यांचा गाढा अभ्यास आहे. कांची, म्हैसूर, मुंबई, पुणे येथे त्यांनी पदवीसह सुवर्णपदक आणि विविध सन्मान मिळवले आहेत. त्यांची अनेक बहुमोली पुस्तके प्रकाशित झाली असून स्वतः च्या वेदांतभवन आचार्य वेदशा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. नाशिकचे शांतारामशास्त्री भानोसे हे दशग्रंथांचे मर्मज्ञ अभ्यासक व घनपाठ पारायणाचे वैदिक विद्वान म्हणून सुपरिचित आहेत. स्मार्त चुडामणी ही सर्वोच्च पदवी त्यांनी प्राप्त केली असून देशविदेशातील यज्ञयागांचे आचार्यपद ते भूषवितात. विविध दुर्मिळ ग्रंथांचे त्यांनी ध्वनीमुद्रण केले आहे. अभय भगवान पाठक हे मूळचे हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील असून तीन वर्षांपासून नाशिक येथील श्री दत्तधाममध्ये रहातात. श्री गुरुगंगेश्वरधाम येथे श्रीकृष्णशास्त्री गोडशे गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे संहिता अध्ययन झाले आहे. १६ महिन्यात त्यांनी गायत्री पुरश्चरण केले आहे.

# विवाहबाह्य संबंधांचे ब्रेकअप! स्वतःला सावरायचं कसं?

**विकोपाला गेलेले वाद सोडवण्यासाठी, कौटुंबिक समस्यांवर मार्गदर्शन घेणेसाठी ज्याप्रमाणे पती-पत्नी, त्याची अपत्य, नातेवाईक समुपदेशनला येतात तसेच विवाहबाह्य संबंध असलेले महिला-पुरुष देखील अनेकदा अशा रिलेशनशिपमुळे होत असलेली घुसमट, मानसिक तणाव, नाते तुटण्याची, एकटं पडण्याची परिस्थिती निर्माण झाल्यावर होणारा त्रास यासाठी समुपदेशन घ्यायला येतात.**



विवाहबाह्य संबंध तत्कालिक स्वरूपाचे असतात, त्याला भविष्य नसते, हे माहिती असूनही कित्येकजण त्यात गुरफटले जातात. दोन्ही बाजूंनी कितीही प्रयत्न केला गेला तरीही त्या नात्याला कधी नाव मिळत नसते आणि हे नातं किती काळ टिकेल, याची शाश्वती नसते. अशा संबंधांत भावनिक, शारीरिक कधी कधी आर्थिक गुंतवणूक बऱ्याच प्रमाणात झालेली असते. जोपर्यंत सर्व सुरळीत सुरू असते, तोपर्यंत स्त्री-पुरुष दोघेही या नात्याचा आनंद घेतात. जे आहे, जे मिळतंय त्यात समाधान मानलं जाते, त्यावेळी आपल्या अशा वागणुकीमुळे जर घरात, समाजात ही गोष्ट पसरली, तर दोन्ही कुटुंब भरडली जाऊ शकतात. किती जण डिस्टर्ब होऊ शकतात. दोघांची मानहानी होऊ शकते. चुकीच्या घटना घडू शकतात. याचा विचार मनात येत नाही. भान हरपून एकमेकांसाठी जमेल तसे सगळे केले जाते. कालांतराने कधीतरी हे बिनबुडाचे नातं कोणत्या न कोणत्या कारणास्तव तुटणार आहे हे दोघांनाही माहिती असते. तरीही मन हे सत्य स्वीकारायला तयार नसते, प्रेम नावाच्या गोंडस संकल्पनेखाली मन सर्रास व्याभिचार करत असतं.

अनेकदा वेगवेगळ्या कारणांनी ब्रेकअपचे प्रसंग येऊन पण दोघांपैकी कोणीतरी माघार घेऊन संबंध वाचवलेले असतात. अशी तात्पुरती मलमपट्टी करून, एकमेकांना नवी आशा देऊन, भावनिक करून परत ये रे माझ्या मागल्या म्हणत हे संबंध सुरूच राहतात. काही कालावधीनंतर अशा रिलेशनशिपमधील नावीन्य, समजूतदारपणा निघून गेला, त्यागाची भावना गेली, आयुष्यात दुसरे कोणी पदार्पण केले किंवा हे नातं डोईजड होऊ लागले की एकमेकांमध्ये सारखेच खटके उडणे, गैरसमज होणे सुरू होते. एकमेकांना भेटायचे टाळणे, बोलायचे टाळणे, त्यासाठी विविध कारणे सांगितली जाणे अशी परिस्थिती निर्माण होते. मी तुझ्यासाठी सगळं सहन करेल या वाक्यापासून झालेली सुरुवात तू माझा फोन घेतलाच का नाही यावरून आकाशपाताळ एक करणे इतपत जाऊन पोहोचते.

अनेकदा हे विवाहबाह्य संबंध अशा वळणावर येतात की कारण काहीही असो दोघांमधील एक जण या नात्यापासून दूर जायचा प्रयत्न करतो किंवा एखादा अचानक सर्व संबंध बंदच करतो. त्याचवेळी दुसरा नाते तोडण्यासाठी तयार असेलच असे नाही. जो मनाने भावनेने जास्तीत जास्त गुंतून गेला आहे त्याला ही परिस्थिती स्वीकारणे खूप अवघड असते. त्याच्यासाठी या प्रसंगातून सावरणे खूप कठीण होऊन बसते. जो या नात्याकडे प्रॅक्टिकली आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून पाहू शकते नाही. त्याच्यासाठी असं नाते संपुष्टात येणे खूप त्रासदायक ठरते. अशा वेळी समजून घ्यावं की, आपल्याकडून काहीही कमी पडलेले नाही. पण समोरच्या व्यक्तीचा आपल्यातील इंटरेस्ट संपलेला आहे. जेव्हा कोणाला आपण नकोसे होतो, तेव्हा कितीही काहीही केल तरी त्याच मन वळवण्यासाठी आपले श्रम आणि वेळ वाया घालवणे मूर्खपणाचे असते. आपण एकतर्फी केलेले प्रयत्न समोरच्याला मानसिक टॉर्चर, दबाव, ब्लॅकमेलिंगसारखे वाटतात.


कोणतेही नातेसंबंध एका बाजूने निभावून सुरू राहू शकत नाही. विवाहबाह्य संबंध तर इतके अधांतरी असतात की, ते दोघांच्या एकत्रित इच्छेशिवाय आणि प्रयत्नाशिवाय टिकूच शकते नाहीत. खरेतर असे संबंध संपुष्टात आणताना दोघांनी एकमेकांशी बोलून, चर्चा करून, त्यामागील कारणे जाणून घेऊन गोडीत वेगळं होणे अधिक उचित असते. ज्यामुळे भविष्यात कोणीही एकमेकांना त्रास देणे, ब्लॅकमेल करणे, फोन मेसेज करून एकमेकांना डिस्टर्ब करत राहणे, रिलेशनची सार्वजनिक चर्चा करणे, घरापर्यंत प्रकरण जाणे असले प्रकार घडणार नाहीत. एकमेकांवर प्रेम करताना किंवा जवळ येताना जो चांगुलपणा दाखवला गेला तोच वेगळे होतानाही दाखवला, तर निदान दूर होताना मानसिक यातना कमी होतात.

ज्या व्यक्तीला आपण नको आहोत, त्याचा सतत पाठपुरावा करून फक्त नैराश्य पदरी पडते. आपण वेळीच स्वतःला सावरलं नाही, तर आपल्याकडून चुकीचे मार्ग अवलंबले जातात, आपलं स्वतःच त्यात खूप नुकसान होऊ शकतं, समोरचाही वैतागून कोणत्याही थराला जाऊ शकतो आणि ते दोघांसाठी त्रासदायक ठरते. त्यामुळे खरे तर अशा रिलेशनशिप ठेवणे टाळावे व ठेवलेच असतील, तर त्यात इतकीच मानसिक भावनिक गुंतवणूक करावी की समोरच्याची इच्छा नसल्यास कुठल्याही वळणावर आपण आनंदाने माघारी फिरू शकू. अशा नात्यात ज्याने आपल्याला मनातून काढून टाकले आहे अथवा ज्याने आपला फक्त वापर केला आहे, त्याच्यासाठी रडत बसण्यात काहीच अर्थ नसतो. उलट वेळीच योग्य आणि ठाम निर्णय न घेतल्यामुळे आणि माघारी न फिरल्यामुळे आपण अधिकाधिक अडकत जाऊन, जास्तीजास्त कमकुवत होत जातो व त्यातून स्वतःला मनस्ताप करून घेतो. आपण जितक्या वेळा नातं टिकवण्यासाठी स्वतःकडून धडपड करतो तितकं समोरील व्यक्ती आपल्याला गृहीत धरू लागते. हे नातेसंबंध जर दोघांची गरज आहे, तर दोघांचे समान योगदान यात अपेक्षित आहे.

विवाहबाह्य संबंधांचं जेव्हा ब्रेकअप होतं, तेव्हा त्याचा आपल्या मानसिकतेवर, आरोग्यावर किती खोल परिणाम करून घ्यायचा हे फक्त आपल्या हातात आहे. आपण जर यातून लवकर बाहेर पडलो नाही, तर आपलं काम, रुटिन, आपली फॅमिली, मुलं, आपली सामाजिक प्रतिष्ठा या सगळ्यावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे झालं गेलं विसरून जाऊन, आपल्या आयुष्यात ज्या सकारात्मक बाबी आहेत, त्या पाहून नव्याने उभ राहणं गरजेचे असते. कोणतंही नातं खूप ताणून तुटण्यापेक्षा, एकमेकांना बेइज्जत करून, अपमान करून अथवा कोणासमोर खूप लाचार होऊन प्रेम परत मिळण्याची अपेक्षा करणे खूप चुकीचं आहे. त्यामुळे असे संबंध ठेवतानाच मनाने, भावनेने खूप खंबीर असणं आवश्यक आहे अन्यथा अश्या चुकीच्या वाटेवर न जाणेच योग्य असत.

**- फॅमिली काऊन्सलिंग : मीनाक्षी जगदाळे**

## शब्दकोडे-११८



**आडवे शब्द**

१. गप्पागोष्टींचा शौक असलेला ४. आजूबाजूला ७. अगरबत्ती ९. त्याचप्रमाणे १०. वर्ष, साल ११. फाशीचा खांब १२. पाणी १४. घसरगुंडी १५. लहान १६. विजयी, कीर्तीमान १८. मृत्यूचा राजा २०. कृष्ण २१. नृत्य, नर्तन २२. होडी २३. फसवणूक २५. एकरूप २७. लेंगा २९. जन्मदाता ३१. नारायणाचा मंत्र जपणारा ३२. माळी ३३. मिरवणूक ३५. साहित्यातील शूरत्वाचा रस ३६. पोलिस ३९. घोंगडी विणणारी जमात ४१. नवरा (ग्रामीण) ४२. माझे ४४. कान ताठ करणे ४६. वरचढ ४७. घर (हिंदी) ४९. येऊन पोहोचणे ५१. लढाई, चुरस ५२. कनवट ५३. उणीव ५६. शामलवर्णी ५७. युद्धक्षेत्र ५८. बर्फाळ प्रदेशातील केसाळ प्राणी ५९. बघा! ६०. परावर्तित ऊन ६२. जागृती ६५. लाकडी वस्तू तयार करणारा ६७. बोलीभाषेत मुख्याध्यापक ६९. दुर्योधनमित्र ७०. पळणे ७१. विमानवेधी यंत्रणा ७२. भ्रमर, भुंगा

**उभे शब्द**

१. गुप्त, खाजगी २. छडीची वनस्पती ३. तिबेटची राजधानी ४. जन्म महिना ५. पर्जन्यकाळ ६. श्रीमंत ७. जमीन व पाणी दोन्ही ठिकाणी वावरणारा ८. शक्तिमान १०. उजवा, उजवीकडील १३. रम्य १७. तजवीज १९. जनतेचा कौल २०. संधीसाधू ही स्वतःची बचावतात! २१. ज्ञानेश्वरांचे समाधी स्थान शोधणारे संत २३. झोळी घेऊन फिरणारा २४. गाजावाजा २६. शाश्वत, चिरंतन २७. झाडाचे कात टाकणे २८. मोठा, जास्त ३०. ओला गोळा ३४. ढीग ३६. शंकराने पचविलेले विष ३७. दडवून ठेवणे ३८. भटकबहाद्दर ४०. मौल्यवान खडा ४१. कणीदार ४३. धान्याचे वजन मोजण्याचे एक जुने परिमाण ४५. दुर्लक्ष करणे ४७. माया ४८. 'अ'चा 'आ' याच्यामुळे होतो ५०. मान्यता, संमती ५१. रेचक ५२. मिठी ५३. थोडेफार ५४. सिद्ध ५५. प्रधानजीचा 'बॉस' ५६. सरळमार्गी ५७. पांढराशुभ्र प्राणी ६१. इमारतीच्या पायात वापरला जाणारा राडारोडा ६३. उष्ण ६४. कळशी ६६. कागदाचे एक परिमाण ६७. शत्रूचे गुप्तपणे काम करणारा ६८. फक्त, केवळ ६९. मांडी, आकडा

## शब्दकोडे ११७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.रहाटगाडगे ५.हद्दपार ७.अवसान ९.मटका १०.अवस ११.सत्याग्रह १२.वास १४.स्थानबद्ध १६.यथार्थ १८.राग १९.रखरखीत २२.दास २३.अमर २४.रबर २५.जबाबदारी २७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप ३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव ४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान ४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम ५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर ५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.कामकाज ६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण ६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर ७५.अंगतपंगत

**उभे उत्तर**

१.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग ५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था ८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर १७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा २४.खटपट २५.जवळपास २६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ ३१.समाधान ३२.वरदान ३४.अटकळ ३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव ४५.दारवठा ४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस ४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन ५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात ६०.मोजदाद ६१.खसखस ६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर ७२.वात

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# नविन नाशकात चारचाकी वाहनांची तोडफोड

## परिसरात दहशतीचे वातावरण, बंदोबस्त वाढवण्याची मागणी








**नाशिक । प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक २५ मध्ये डॉ. हेडगेवारनगर येथे काल रोजी मध्यरात्री अज्ञात टवाळखोरांकडून १६ ते १७ गाड्यांच्या काचा फोडण्यात आल्या. यामुळे परिसरात दहशत माजवण्याचा प्रकार घडविण्यात आले असल्याचे लक्षात येते. मोठ्या प्रमाणावर तोडफोड झाल्याने वाहनांचे मोठे नुकसान झाले असून त्याची भरपाई कोण करणार? यामागचे खरे सूत्रधार कोण आहेत? हे शोधून पोलिसांनी संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे. तर या भागात बंदोबस्त वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे.




दरम्यान यावेळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन या ठिकाणी आ. सीमा हिरे, माजी नगरसेविका भाग्यश्री ढोमसे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, अंबड पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी यांनी समक्ष जाऊन पाहणी करून भागातील लोकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आ सीमा हिरे व भाग्यश्री ढोमसे यांनी परिसरातील नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. तर दोषीवर कडक कारवाई करण्यात येईल असे आश्वासनही दिले आहे.

नवीन नाशिक किंवा सिडको असे समजले जाणाऱ्या या भागात अधून-मधून वाहनांची जाळपोळ करणे, वाहनांच्या काचा फोडणे आदी प्रकार घडवले जातात. एक प्रकारे दहशत माजवण्याचा प्रयत्न यातून दिसत असल्याने पोलिसांनी या मागचे खरे सूत्रधार शोधून त्यांना गजाआड करावे अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान या घटनेमुळे परिसरामध्ये दहशत पसरली असून खळबळ उडाली आहे. आपली वाहने कुठे सुरक्षित ठेवता येईल? याचाही काही जणांनी आता शोध सुरू केला आहे. जागा कमी असल्याने काही जणांची वाहने ही रस्त्यावर किंवा मोकळ्या जागेत घरापासून दूर उभी केली जातात. नेमका याचाच फायदा काही समाजकंटक हे उचलत असल्याचे लक्षात येते.

# डॉ. सौरभ खवले पुणे विद्यापीठाच्या निमेशन अभ्यास मंडळावर अध्यक्षपदी



**नाशिक ।** केटीएचएम महाविद्यालयाच्या निमेशन विभागाचे प्रमुख डॉ. सौरभ खवले यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत निमेशन अभ्यासमंडळावर अध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे पत्र विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ मुंजाजी रासवे यांनी दिले आहे.

निवड ही दोन वर्षासाठी आहे. या निवडीबद्दल डॉ. खवले यांचा मविप्र संस्थेच्या वतीने सरचिटणीस ड.नितीन ठाकरे यांनी सत्कार केला. यावेळी केटीएचएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर उपस्थित होते.




# उद्धव ठाकरे यांच्या विरोधात त्रिमूर्ती चौकात भाजपचे आंदोलन

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्रिमूर्ती चौकात शिवसेना उबाठा शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले. भारतीय जनता पार्टीचे नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल उद्धव ठाकरे यानी अवमानकारक भाषेत शब्द उच्चारले म्हणून काल बुधवार रोजी सकाळी ११ वाजता जाहीर निषेध त्रिमूर्ती चौक येथे करण्यात आला.

उद्धव ठाकरे यांच्या विरोधात आंदोलन करून विविध घोषणा देऊन निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी आ.सीमा हिरे, जगन पाटील, मंडलाध्यक्ष अविनाश पाटील, नाशिक महानगर उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील, महेश हिरे, महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस छाया देवांग, माजी नगरसेविका भाग्यश्री डोमसे, सातपूर मंडळ अध्यक्ष भगवान काकड, सिडको एक मंडल अध्यक्ष शिवाजी बरके, आबा पवार, प्रकाश चकोर, माधवी मोराणकर, डॉ. दिगंबर सनांसे, उखा चौधरी, राजेंद्र बाफना, गणेश ठाकूर, मकरंद वाघ, दिलीप देवांग, राम बडगुजर, राकेश डोमसे, ज्योती वडाळकर, योगिता अमृतकर, ज्योती कुवर, आदित्य दोंदे, रवी जोशी, शरद फडोळ, साईनाथ गाडे, रवी पाटील प्रशांत कोतकर, रामचंद्र जगताप, गजानन रणबावळे, युवराज सैंदाणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बांधकाम उद्योगातील विविध संस्थांतर्फे समस्यांच्या निराकरणासाठी मनपाला निवेदन

## प्रभारी आयुक्तांची समस्या निराकरणासाठी आश्वासक भूमिका

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातील बांधकाम उद्योगास भेडसावणाऱ्या विविध समस्यांसाठी शहरातील बांधकाम उद्योगाशी संबंधित सर्व संस्था एकवटल्या असून या समस्यांच्या निराकरणासाठी या सर्व संस्थांनी काल एकत्रितपणे एक निवेदन नाशिक महापालिकेच्या प्रभारी आयुक्त भाग्यश्री बानायत यांना दिले. या संस्थामध्ये क्रेडाई नाशिक मेट्रो, नरेडको, आर्किटेक्ट व इंजिनियर्स असोसिएशन, इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट, असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हील इंजिनीअर्स व इन्स्टिट्यूट ऑफ इंडिअन इंटेरियर डिझाईनर्स या संस्थांचा समावेश होता.

याप्रसंगी क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील, मानद सचिव गौरव ठक्कर, माजी अध्यक्ष रवि महाजन, नरेडकोचे अध्यक्ष अभय तातेड, इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टचे नवनिर्वाचित अध्यक्ष आर्किटेक्ट रोहन जाधव, असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हील इंजिनीअर्सचे अध्यक्ष अनिल कडभाने, आर्किटेक्ट व इंजिनियर्स असोचे अध्यक्ष नरेंद्र भुसे, इन्स्टिट्यूट ऑफ इंडिअन इंटेरियर डिझाईनर्सच्या अध्यक्षा आर्किटेक्ट वैशाली प्रधान या उपस्थित होत्या.

यावेळी बिल्डींग प्लॅन, ले-आऊट प्लॅनच्या मंजुरीकरीताची कार्यप्रणाली व इतर अडचणी संदर्भात प्रभारी आयुक्त यांच्याशी चर्चा करण्यात आली. या सर्व समस्या प्रभारी आयुक्त भाग्यश्री बानायत यांनी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. दिलेल्या निवेदनात पुढील प्रमाणे मागण्या आहेत. त्यामध्ये बिल्डींग प्लॅन व ले-आऊटची प्लॅनची प्रकरणे नाशिक मनपात मंजुरीसाठी दाखल केले असता असे कळते की, मंजुरीच्या पध्दतीप्रमाणे दाखल प्रकरणे ही ज्युनियर इंजिनियर, डेप्युटी इंजिनियर, एक्झिक्युटीव्ह इंजिनियर, एडीटीपी, डीडीटीपी, अतिरिक्त आयुक्त व आयुक्त या ७ डेस्कवरून मंजुर झाल्याशिवाय अंतीम बिल्डींग किंवा ले- आऊट प्लॅनची परवानगी सध्या मिळत नाही. इज ऑफ डुईंग बिझनेसच्या दृष्टीकोनातून बिल्डींग परवानग्या या ज्युनियर इंजिनियर, डेप्युटी इंजिनियर, एक्झिक्युटीव्ह इंजिनियर अश्या ३ डेस्क पर्यंत तर ले-आऊट प्लॅनच्या परवानग्या या ज्युनियर इंजिनियर, डेप्युटी इंजिनियर, एडीटीपी या ३ डेस्कवर मंजुर करण्यात याव्यात असे अपेक्षित आहे. ले-आऊट प्लॅनच्या आणि बिल्डींग परवानगीच्या डेस्कची संख्या ७ वरुन ३ पर्यंत कमी करण्यात यावी. यामुळे बिल्डींग व ले-आऊट प्लॅनच्या परवानग्या लवकर मिळु शकतील. नगर नियोजन विभाग, नाशिक हे शासनाच्या गतिशील प्रशासनाबाबतीत नेहमीच अग्रेसर राहीले असून ते कायम राखण्यात नाशिक यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच नाशिक मनपात जमिनीच्या मोजणीसाठीचे जे सर्व्हे अर आहेत त्यांच्या कार्यकालाची मुदत संपलेली असुन नविन सर्व्हेअर च्या नियुक्तीची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे नवीन नियुक्ती करतांना कमीत कमी ३ किंवा ५ सर्व्हेअरची पॅनलिस्ट म्हणुन नियुक्ती करण्यात यावी. यामुळे एकापेक्षा जास्त सर्व्हेअर पॅनलिस्ट असल्यामुळे जमीन सर्वे व मोजणीच्या कामाचा लोड येणार नाही आणि कामाचा वेग वाढून कामे झपाटयाने होऊ शकतील आदी मागण्या निवेदनात नमूद करण्यात आल्या आहेत.

# मंत्री भुजबळांच्या पाठपुराव्यानंतर येवल्यातील स्वातंत्र्य सेनानी तात्या टोपे यांच्या स्मारकाला गती

**नाशिक । प्रतिनिधी**

मंत्री छगन भुजबळ यांच्या पाठपुराव्यातून स्वा.सेनानी तात्या टोपे यांच्या स्मारकास राज्य शासनाचा १ कोटी ५७ लक्ष रुपयांचा हिस्सा वितरित करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे. त्यामुळे रखडलेल्या या कामाला आता अधिक गती मिळणार आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पहील्या संग्रामातील तात्या टोपे हे एक प्रमुख सेनानी होते. त्यांच्या अतुलनिय त्यागाने व शौर्याने भारतीय स्वांतत्र्याच्या इतिहासात एक प्रेरणादायी अध्याय लिहिला गेलेला आहे. त्यांचा हा इतिहास स्मरणात राहावा यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या निधीमधून येवला येथे त्यांचे स्मारक विकसित करण्यात येत आहे. या स्मारकाचे काम निधी अभावी बंद पडले होते. यासाठी मंत्री छगन भुजबळ यांचा सातत्याने पाठपुरावा सुरु होता. याबाबत सांस्कृतिक कार्य विभागाकडून शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

स्वा.सेनानी तात्या टोपेंच्या मुळ गावी म्हणजे येवला येथे नगरपरीषदेच्या मालकीच्या स. न. ४९ व ५० बाभुळगाव खु.येथे त्यांचे स्मारक उभारण्याच्या सुमारे १०.५० कोटी रकमेच्या कामास केंद्र शासनाच्या सांस्कृतीक कार्य विभागाने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे. यासाठी केंद्र शासन ७५ टक्के, राज्य शासन १५ टक्के व नगर परिषद १० टक्के निधि उपलब्ध करुन देणार असल्याचे निश्चित झालेले आहे. यानुसार केंद्र शासनाने त्यांच्या हिश्श्याच्या ७.८८ कोटी पैकी ३.९४ कोटी म्हणजे अर्धा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यासाठी राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रु. १.५७ कोटी वितरीत करण्यासाठी शासन निर्णय प्रख्यापित करण्यात आलेला असून निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

स्वा.सेनानी तात्या टोपे यांच्या या स्मारकात स्मृती उद्यान बांधण्यात येणार आहे. सदर उद्यानात माहिती केंद्र, शिल्पकृती, गॅलरी, प्रदर्शन हॉल, वाचनालय, ऑडिओ व्हिज्युअल हॉल, प्रतिकात्मक शिल्प गार्डन, लेझर शो, कॅफेटेरिया, बगीचा, चिल्ड्रन पार्क, पार्किंग इत्यादी बाबींचा समावेश आहे.



# आडगावच्या क्रांती सय्यद सीए परीक्षा उत्तीर्ण

## आडगांव ग्रामस्थ, रयत शिक्षण संस्थेतर्फे सत्कार

**नाशिक । प्रतिनिधी**

येथील पत्रकार मोहम्मद सय्यद यांच्या कन्या क्रांती सय्यद या मे २०२३ मध्ये झालेल्या अंतीम सनदी लेखापाल (सीए) परीक्षेत उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झाल्या.

याबद्दल आडगांव ग्रामस्थ व रयत शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थी संघातर्फे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य भाई पुंजा माळोदे यांच्या हस्ते पुष्प गुच्छ, शाल व फेटा देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पाल्य, ग्रामस्थ व माजी विद्यार्थी उपस्थित होते. याअगोदर आडगाव सोसायटीचे चेअरमन गणपतराव शिंदे व जेष्ट संचालक सुरेश माळोदे तसेच विंचूरगवळी ग्रामस्थांतर्फे रिकामे व ग्रामस्थांनी क्रांती सय्यद व त्यांच्या पालकांचा यथोचित सत्कार केला. क्रांती सय्यद यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

**ॲड. शशिकांत आर. पाटील**
**निशाणी नं.६**

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे.७ वे ज्युडि मॅजि. सो. धुळे यांचे कोर्टात**
**फौ. कि. अर्ज नं.-५४५/२०२३**

भानुदास धोमण उर्फ ढोमण पाटील
उ.वय.:-६९ वर्ष, धंदा:-खाजगी नोकरी,
रा.कापडणे, ता. जि. धुळे.
ह. मु. ११, कालीका माता मंदिरामागे, चौगुले प्लॉट, जळगाव.
.....**अर्जदार**

**विरुध्द**
म.ग्रामसेवक सो.
ग्रामपंचायत कार्यालय, कापडणे, ता. जि. धुळे ...**सामनेवाला**

**(ढोमण उर्फ धोमण रामचंद्र पाटील (मयत) यांचा मृत्यु दि. १३/०२/१९७२ रोजी)**

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. मुख्य न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात दि. ०१/०७/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं.५४५/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे त्यांचे वडील नामे ढोमण उर्फ धोमण रामचंद्र पाटील (मयत) यांच्या मृत्युची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २२/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं.७ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ५/७/२०२३

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**मे.न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग** — **मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग**

**निशाणी नं.६**

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश क. स्थर सो. यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७५८/२०२३**

१) श्रीमती सुमित्रा मोना राउत उ.व.६५-वर्ष,धंदा-गृहिणी
२) श्री. आशिष मोना राउत उ.व.-४४ वर्षे धंदा
३) अमोल मोना राउत उ.व.-४० वर्षे धंदा
४) अजित मोना राउत उ.व.-३८ वर्षे धंदा
सर्व देवपुर चर्च कंपौड,१०, नेहरु नगर,
वाडीभोकर रोड, देवपुर धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**
कै. मोना भिडा राउत ...**मयत**
कुणीही नाही ...**सामनेवाला**

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII, १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठीचा

ज्याआर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्थर सो. धुळे दि. २६/०६/२०२३ रोजी दि.कि. अर्ज. नं. ७५८/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII, १८२७ चे कलम प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठीचा अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम स्वरुपी राहत असून अर्जदार यांची आई कै.जिजाबाई संतोष मिस्तरी यांची मुत्यु दि. २८/०२/२०२३ रोजी धुळे येथे झालेला आहे. त्यांचा वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि.१०/०८/२०२३ ही निश्चित केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबतकाही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्थर सो. कोर्ट नं.१ यांचे न्यायालयात निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ३०/०६/२०२३

**कनिष्ठ लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर धुळे** — **दिवाणी न्यायालय, व.स्तर धुळे**

**ॲड. पांडुरंग आर. पीसे**
**निशाणी नं.६**

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे कोर्टात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८३६/२०२३**

१) आनंदा ताराचंद माळी, उ.व. ४६ वर्षे, धंदा- मजुरी,
२) हिम्मत ताराचंद माळी, उ.व. ४२ वर्षे, धंदा- मजुरी,
३) कोकीळा चुडामण माळी, उ.व. ५३ वर्षे, धंदा - घरकाम,
४) कल्पना राजेंद्र सावंत, उ.व. ५० वर्षे, धंदा- घरकाम,
नं. १ ते ४ रा. संत तुकाराम नगर, पूणे,
५) अनिता संजय माळी, उ.व. ४२ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. कळंबु, ता. जि. नंदुरबार .....**अर्जदार**

**विरुध्द**
कुणीही नाही ...**सामनेवाला**
कै. ताराचंद सिताराम माळी ...**मयत**
कै. सुमन ताराचंद माळी ...**(मयत पत्नी)**

**बॉम्बे रेग्युलेशन कायदा तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज**

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी मयत कै. ताराचंद सिताराम माळी यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि.अर्ज धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ८ यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. २३/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. ताराचंद सिताराम माळी यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि. ७/७/२०२३ आदेशावरुन

**कनिष्ठ लिपीक** (शिक्का) **सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, धुळे** — **दिवाणी न्यायालय, धुळे**

## न्यूज कॉलम

### राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन

**धुळे ।** तालुक्यातील दह्याणे येथील जिल्हा परीषद शाळेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन कार्यक्रम झाला. या वेळी गोरगरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तक व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते किरण पवार, डॉ. दिवाकर मराठे, सरपंच अलका राजपूत, उपसरपंच रोहिदास पवार, एकनाथ पाटील, विठोबा पाटील, गोलू पाटील, गोपीनाथ पाटील, रमेश पाटील, देवीदास पवार, साहेबराव राजपूत, दयाराम माळी, राजेंद्र राजपूत, भीमराव मोरे, बंडू पवार, कैलास राजपूत, कैलास पाटील, रावसाहेब पाटील आदी उपस्थित होते.

### 'एसआरपीएफ' मैदानावर मनपातर्फे स्वच्छता मोहीम

**शिरपूर ।** शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत एसआरपीएफ मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यक्रम झाला. या कार्यक्रमानंतर मैदानावर महापालिकेतर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सकाळी सात ते अकरादरम्यान राबविण्यात आलेल्या या मोहिमेत महापालिका आयुक्त देवीदास टेकाळे, अतिरिक्त आयुक्त विजय सनेर, सर्व स्वच्छता निरीक्षक व त्यांचे पथक सहभागी झाले. संपूर्ण मैदानावरील केरकचरा, प्लॅस्टिक बाटल्या, डिशेस, खाद्यपदार्थ आदी कचरा संकलित करण्यात आले.

# मंदिरातील दानपेट्यांची चोरी; मध्यप्रदेशमधून दोघे ताब्यात

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बोरीस गावातील मंदिरांमधील दानपेट्या चोरी झाल्या होत्या. याचा तपास पोलिसांकडून सुरू होता. या दरम्यान मंदिरातील दानपेटी चोरी करणाऱ्या दोघा चोरट्यांच्या मध्यप्रदेशमधून स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने अटक केली आहे.



धुळे तालुक्यातील सोनगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये असलेल्या बोरीस या गावातील मंदिरातून दानपेट्या चोरी गेल्याची घटना गेल्या ४ जुलैला उघडकीस आली होती. यामध्ये लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरामध्ये चोरट्यांच्या हालचाली देखील कैद झाल्या होत्या. या अनुषंगाने सीसीटीव्ही फुटेच्या आधारे सोनगीर पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने समांतर तपास सुरू केला होता.

बोरीस गावातील सती देवी मंदिरातील दानपेटीतील रक्कम चोरट्यांनी चोरून नेलेली होती याबाबत मंदिराचे व्यवस्थापक प्रसाद भीमराव पाटील यांच्या फिर्यादीवरून सोनगीर पोलिसात गुन्हा दाखल झाला होता या प्रकरणी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने तपासात अत्यंत सावधानता बाळगत सीसीटीव्ही चित्रण तसेच तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून आरोपींचा शोध घेतला पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी थेट मध्यप्रदेशपर्यंत या गुन्ह्याचा तपास केला मुकेश वास्कले व भोरेलाल सोलंकी रा. वाक्या तालुका सेंधवा जिल्हा बडवानी या दोघांनी ही चोरी केल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला मिळाली. त्यानंतर या पथकाने मध्य प्रदेश राज्यातून या दोघांना ताब्यात घेतले. वाक्या या गावात शोध घेत असताना पोलीस आल्याचा सुगावा

लागताच आरोपींनी पळ काढला पोलीस पथकाने त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडले मुकेश भावन सिंग वासकले (वय-२०) भोरेलाल जेमाल सोलंकी या दोघांनी हा गुन्हा केल्याचे कबूल केले त्यांच्याकडून दानपेटीतील १८० रुपयाची एक रुपयाचे नाणे, तसेच ५१८ रुपयांचे दोन रुपयाचे ८६० रुपयांचे पाच रुपयांची १७२ नाणी त्याचबरोबर दहा रुपयांची १०३ तसेच दहा रुपयांच्या नोटांची १९८ नोटा वीस रुपये दराच्या सहा नोटा तसेच शंभर रुपये चांदीच्या धातूची दोन ग्रॅम वजनाची अंगठी असा एकूण ४ हजार ८३४ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला पोलीस अधीक्षक संजय बारकुंड अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे सहायक पोलीस अधीक्षक यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हा आणि विष्ण विभागाचे निरीक्षक हेमंत पाटील यांच्यासह बाळासाहेब सूर्यवंशी असे संजय पाटील हेड कॉन्स्टेबल संदीप सरक योगेश चव्हाण मायूस सोनवणे पंकज खैरमोडे महेंद्र सपकाळ किशोर पाटील मयूर पाटील योगेश जगताप सुनील पाटील अमोल जाधव यांनी ही कारवाई केली.

# बोराडी येथून चोरीस गेलेले वाहन हस्तगत




**धुळे । प्रतिनिधी**

शिरपूर तालुक्यातील बोराडी येथून बोलेरो पिकअप वाहन चोरी झाल्याची घटना सहा महिन्यांपुर्वी घडली होती. या घटनेचा उलगडा करण्यात एलसीबीला यश आले असून सदर वाहन मध्यप्रदेश-गुजरात राज्याच्या सीमावर्ती भागातून हस्तगत करण्यात आले.

बोराडी येथील जयंतीराम नारायणदास चौधरी यांचे बोलेरो वाहन (एमएच १८/बीजी ०२७०) हे दि.६ फेब्रुवारी २०२३ रोजी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले होते. याप्रकरणी त्यांनी शिरपूर तालुका पोलिसांत फिर्याद दिली होती. तथापि, शिरपूर तालुक्यात मध्यप्रदेश राज्याच्या सीमावर्ती भागात चारचाकी वाहन चोरीच्या घटना घडत असल्याने एसपी संजय बारकुंड यांनी एलसीबीचे पीआय हेमंत पाटील यांना तपास करण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार सदर चोरट्यांचा शोध घेत असताना पीआय हेमंत पाटील यांना गुप्त माहिती मिळाली की, सदर बोलेरो पिकअप वाहन मध्यप्रदेश-गुजरात राज्याच्या सीमावर्ती भागात कालीयावाव ता.भाबरा जि.अलीराजपूर येथे आहे. तसेच या वाहनास जीजे ०९/झेड ७५७० हा बनावट क्रमांक लावला असून ते वाहन बबलू कालू चौहान रा.कालीयावाव याच्या राहत्या घरासमोर लावले असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार एलसीबीच्या पथकाला तात्काळ मध्यप्रदेश राज्यात रवाना करण्यात आले. पथकाने सदर ठिकाणी जावून वाहन व आरोपीचा शोध घेतला. परंतु, पोलिसांचा सुगावा लागताच आरोपी बबलू चौहान पळून गेला. यावेळी पथकाने त्याच्या घरासमोर लावलेले दीड लाख रुपये किमतीचे बोलेरो पिकअप वाहन (एमएच १८/बीजी ०२७०) हस्तगत केले. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोनि. हेमंत पाटील, पोसई. बाळासाहेब सूर्यवंशी, असई. संजय पाटील, पोना. मायुस सोनवणे, पंकज खैरमोडे, पोकॉ. महेंद्र सपकाळे, किशोर पाटील, मयुर पाटील, योगेश जगताप, सुनिल पाटील, अमोल जाधव यांच्या पथकाने केली.



## जैताणे येथे तपासणी शिबिर संपन्न

**जैताणे । ग्रापालिका व शंकरा आय हॉस्पिटल, आनंद (गुजरात ) यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन गावात करण्यात आले होते. यामध्ये १६० रुग्णाची तपासणी करण्यात आले. त्यांच्या पैकी ५१ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी पाठवण्यात आले. डोळ्यांची तपासणी डॉ सोनवणे यांनी केली. शिबिराचे आयोजन जैताणे ग्रामपालिकीचे उपसरपंच बाजीराव बुवाजी पगारे, शिबिराचे संयोजन गणेश देवरे यांनी केले.**

## साक्री येथे मनसेतर्फे एक सही संतापाची उपक्रम

**साक्री ।** राज्यात होत असलेल्या राजकीय उलथापालथीचा निषेध म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे एक सही संतापाची हा उपक्रम राज्यभर घेण्यात येत आहे. या अनुषंगाने साक्री येथे देखील उपक्रम घेण्यात आला. यात गोल्डी पॉइंटजवळ एक भला मोठा फलक लावून यावर 'एक सही संतापाची' असा मजकूर देण्यात आला होता. यात राज्यात होत असलेल्या राजकीय उलथापालथीतून लोकांमध्ये असलेली चीड या माध्यमातून व्यक्त होत असल्याची भावना या वेळी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या राज्य सरचिटणीस सायली सोनवणे यांनी व्यक्त केली. या वेळी सरचिटणीस सायली सोनवणे, मनसे जिल्हा संघटक धीरज देसले, भूषण साळुंखे, यश चांदुरकर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# जखाणे येथील महाविद्यालयात सायकल वाटप

**चिमठाणे । प्रतिनिधी**

माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, जखाणे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील शाळेत मानव विकास मिशन अंतर्गत इ. ८ वी ते इ.१२ वी. पर्यंत शिक्षण घेत असलेल्या व गावापासून दोन कि.मी. ते पाच कि.मी.अंतरावर राहणाऱ्या गरजू मुलींना मोफत सायकल वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान विद्यालयाच्या प्राचार्या एस.एस. पाटील हे होते. संस्थेचे खजिनदार विनयकुमार गुलाबराव शिंदे ,विद्यार्थी पालक म्हणुन रामचंद्र कोळी ,भट्टू सिताराम माळी ,भिमसिंग भिल,लक्ष्मण पाकळे ,सागर कोळी ,युवराज कोळी ,राजाराम मोरे ,दगडू निकुम,हे उपस्थित होते.

सर्व प्रथम कार्यक्रमाची सुरूवात विद्येची देवता सरस्वती माता यांच्या प्रतिमेचं पुजन करून करण्यात आली. शेवाडे ,आरावे ,बेहेड येथील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाचा हेतु या मागचा एकच आहे की, मुलींनी शिक्षणापासुन वंचित राहु नये,रोज शाळेत यावे ,चांगलं शिकावं , काहीतरी बनून आई वडीलांचे स्वप्न साकार करावे असा मोलाचा संदेश विद्यालयाच्या प्राचार्या सौ. एस.एस.पाटील यांनी संबोधित केले. इ.१२ वी च्या मुलींना सायकल देवून अत्याआनंद झाला यात बेहेड येथील लाभार्थी विद्यार्थीनी सोनम सुभाष कोळी, नंदिनी नाना कोळी, निकीता मोरे, करीना गोविंदा शिंदे ,छकुली रामदास मोरे, शेवाडे येथिल लाभार्थी कु.हितांक्षी भटू माळी, वर्षा रामचंद्र कोळी, कविता दगडु निकुम, श्वेता राजाराम मोरे, मिना भिमसिंग भिल, सुनंदा नंदराज मोरे, गंगाबाई पिंटू मोरे, आरावे येथिल लाभार्थी विद्यार्थिनी प्रियंका लक्ष्मण पाकळेया विद्यार्थीनींना योजनेचा लाभ मिळाला. यावेळी एस.डी.भामरे, एन.एन.पाटील, व्ही.एल. सोनवणे, डी.बी. सोनवणे, के.व्ही.देवरे, व्ही.बी. कंखर, प्रा.वाय.बी.पाटील, प्रा.महेंद्र एस.बच्छाव, श्रीमती एम.डी.सैंदाणे, भुषण पाटील, कैलास बच्छाव, नानाभाऊ वाघ यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

# दि इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस्, नाशिक सेंटरच्या अध्यक्षपदी जाधव

**नाशिक । प्रतिनिधी**

१०६ वर्षांचा दैदिप्यमान इतिहास लाभलेल्या व देशभरात २५,००० च्या वर सभासद संख्या असलेल्या दि इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस् (आयआयए) या संस्थेच्या, नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत नाशिक सेंटरच्या अध्यक्षपदी आर्किटेक्ट रोहन जाधव यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे.

दि इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस् या संस्थेमार्फत वास्तुकला शिक्षणाचा प्रसार करणे, वास्तुकला व्यवसायाची पातळी परस्पर सहकार्यातून उंचावणे व वास्तुकला व्यवसायाच्या अनुषंगाने समस्त वास्तुविशारदांच्या हितसंबंधांची जपणूक करण्याचे काम केले जात असते. कला, वास्तुकला व बांधकाम क्षेत्राशी संबंधित अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समित्यांवर आयआयए प्रतिनिधित्व करत असते. तसेच आयआयए ही विविध संस्थांशी संलग्न आहे. राज्यस्तरावर तसेच नाशिक सेंटर स्तरावर देखील, सामाजिक हिताच्या दृष्टीने आयआयए विविध व्यासपीठांवर कार्यरत आहे. शहरातील बांधकाम क्षेत्राशी संबंधित तसेच शहराच्या एकूणच सर्वांगीण विकासासाठी तसेच सामाजिक व कला क्षेत्राच्या जडणघडणीसाठी आयआयए नाशिक सेंटर मोलाचा वाटा उचलत असते.

# शालिनी भदाणे यांनी केले लेकीच्या जन्माचे स्वागत

### कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिरास भेट

**धुळे । प्रतिनिधी**



बोरकुंड जिल्हा परिषद गटाच्या कार्यक्षम जिल्हा परिषद सदस्या शालिनी बाळासाहेब भदाणे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र बोरकुंड येथे भेट दिली तेथे जन्माला आलेल्या नवजात बालक यांना आरोग्याच्या दृष्टीने महत्वाची बेबी किट व उबदार कपड्यांचे वाटप केले.

यावेळी मातेला साडीचा आहेर व आरोग्याला पोषक फळांचे आहार वाटप करण्यात आला. तसेच जन्मलेल्या लेकींचे स्वागत करण्यात आले व प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे आयोजित केलेल्या कुटुंब नियोजन शिबिरातील शस्त्रक्रिया झालेल्या महिला रुग्णांची भेट घेतली. रुग्णाना सामोरे जाव्या लागणाऱ्या समस्या जाणून घेतल्या व त्या सोडविण्या सदर्भाच्या सूचना आरोग्य अधिकारी यांना केल्या,प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सोयी सुविधांची पाहणी करत विविध कामांची माहिती व आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असलेल्या औषध साठा, आरोग्य अधिकारी, स्टाफ नर्स, इतर कर्मचारी यांना काम करताना येणाऱ्या समस्या समजून घेत त्या सोडविण्यास आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# आर. सी. पटेल पॉलिटेक्निक मध्ये जिल्हा कौशल्य विकास आराखडा बैठक

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर. सी. पटेल पॉलिटेक्निक मध्ये श्रीमती ममता हटकर (जिल्हा नियोजन अधिकारी धुळे) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कौशल्य विकास आराखडा संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली.



आढावा बैठकीत जिल्हा नियोजन समिती आणि धुळे जिल्हा कौशल्य आणि उदयोजकता विभागाच्या तज्ञ मंडळींनी जिल्हा कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत सुरु असणाऱ्या बॅचमधील लाभार्थ्यांशी संवाद साधला.

या बैठकीत तज्ञ मंडळींनी जिल्हा नियोजन मंडळ मार्फत चालविल्या जाणाऱ्या कौशल्याच्या कोर्सेस बाबत माहिती दिली. लाभार्थ्यांशी बोलत असतांना तज्ञ मंडळींनी धुळे जिल्ह्याच्या विकास आराखड्यात सहभागी होऊन धुळे जिल्हा प्रगतीवर नेण्यासाठी कौशल्य विकास माध्यमातून जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. लाभार्थ्यांनी तज्ञ मंडळींना नवीन अभ्यासक्रम आधारित कोर्सेस जसे की, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, सोलर टेक्नॉलॉजी,सीएनसी टेक्नॉलॉजी आणि इलेक्ट्रिकल व्हेईकल जिल्हा कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत सुरु करावे असे सूचविले. तज्ञ मंडळींमध्ये एन. एम. आय. एम. एस. मुंबई येथील डॉ. मीना गलरीया, डॉ. राज सुलोचना, डॉ अंजली गुर्जर, आर. एन. वाकुडे (सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास विभाग, धुळे), अशोक राणे (सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी), मनीष सूर्यवंशी (नियोजन विभाग) उपस्थित होते. आर. सी. पटेल पॉलिटेक्निकच्या वतीने प्राचार्य डॉ. नवीन हासवाणी यांनी तज्ञ मंडळींचे स्वागत केले व पॉलिटेक्निक आणि ट्रेनिंग सेंटर मधील विद्यार्थ्यांच्या सुरु असलेल्या उपक्रमांची माहिती तज्ञ मंडळींना करून दिली. तसेच मागील दोन वर्षापासून सुरु असलेल्या कौशल्य आधारित कोर्सची आणि रोजगाराची माहिती प्रा. निलेश पाटील यांनी दिली. आभार प्रा.स्वप्नील बाफना यांनी मानले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
ज्ञानगंगा घरोघरी
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577





# येवला मतदारसंघातील सरपंच लोकप्रतिनिधींचा भुजबळ यांच्या निर्णयाला पाठींबा













नाशिक । येवला

मतदारसंघातील लासलगाव, विंचुरसह परिसरातील ४२ गावांचे सरपंच आणि लोकप्रतिनिधीनी छगन भुजबळ यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे. काल सकाळी भुजबळ फार्म येथे भेट घेत सर्व लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी भुजबळांना पाठिंबा दिला. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाळासाहेब क्षिरसागर, भाऊसाहेब भवर, दत्तात्रय डुकरे, शिवाजी सुपनर, दत्ता रायते, सचिन दरेकर, आत्माराम दरेकर, चंदु लांडूबले, बबन शिंदे, मंगेश गवळी, माधव जगताप, राहुल डूमरे, सुरेखा नागरे, प्रदीप तीपायले, पांडुरंग राऊत, विशाल नागरे, अविनाश सालगुडे, उन्मेष डूमरे, सुनिता शिंदे, वाल्याबाई शिंदे, मनीषा चव्हाणके, मनीषा वाघ, आकाश वाघ, सचिन रुकारी, बापू बागल, ज्ञानेश्वर वाघ, वाल्मिक सोदक यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना सर्व सरपंच म्हणाले की, पवार साहेब बरे झाले आपण अशी चुक केली, त्यामुळे आमचा विकास झाला. छगन भुजबळ यांनीच आमच्या भागाचा विकास केला आहे. जी चुक भुजबळांच्या बाबतीत केली असे आपण म्हणालात ती चुक आपण सगळ्या मतदारसंघात करा सर्व महाराष्ट्राचा विकास होईल अशा भावना देखील त्यांनी व्यक्त केल्या. तसेच आम्ही आपल्या सोबत आहोत. येवला लासलगावसह सर्व लोक आपल्या सोबत कायम आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते देखील आपल्या सोबत आहेत असा विश्वास त्यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे व्यक्त केला.

CMYK
दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# सप्तश्रृंगी घाटाच्या दरीत कोसळली बस ; एक ठार














नाशिक । जिल्ह्यातील

वणी येथील सप्तशृंगी गड घाटात एसटी बस दरीत कोसळल्याने भीषण अपघात घडला आहे. सदर अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून २० हून अधिक जण जखमी झाले आहेत. सदर घटनेची माहिती समजताच जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन अपघाताची पाहणी केली. त्यानंतर अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांची वणी येथील रुग्णालयात जाऊन भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. याप्रसंगी स्थानिक पदाधिकारी देखील उपस्थित होते. दरम्यान, यावेळी दादा भुसे यांनी रुग्णालयातील डॉक्टरांकडून जखमींवर सुरु असलेल्या उपचारांची माहिती जाणून घेतली व त्यांच्यावर सर्वोत्तम वैद्यकीय उपचार करावेत असे आदेश जिल्हाधिकारी व जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले. मिळालेल्या माहितीनुसार गेल्या दोन ते तीन दिवसांपूर्वी अमळनेर तालुक्यातील मुडी येथील एकूण १४ महिला या नाशिक येथील वणी गडावर सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी एकत्र गेल्या होत्या. यादरम्यान सप्तशृंगी देवीचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांच्या या बसला अपघात झाला. सप्तशृंगी गडाच्या घाटात गणपती टप्प्यावरुन बस दरीत कोसळली. या मुडी येथील महिला भाविक आशाबाई राजेंद्र पाटील यांचा मृत्यू झाला आहे. तर त्यांच्या सोबतच्या महिला ह्या जखमी झाल्या आहेत. या बसमध्ये मूडी प्र. डांगरी येथील १४ प्रवासी होते. त्यातील आशाबाई राजेंद्र पाटील यांचा मृत्यू झाला असून मूडी येथील प्रमिलाबाई गुलाबराव बडगुजर, संजय बळीराम भोई, सुशिलाबाई सोनू बडगुजर, वच्छलाबाई साहेबराव पाटील, सुशीलाबाई बबन नाजन, विमलबाई भोई, प्रतिभा संजय भोई, जिजाबाई साहेबराव पाटील, संगीता मंगुलाल भोई, रत्नाबाई, सुरेखाबाई हिरालाल बडगुजर, संगीता बाबूलाल भोई, भारगोबाई माधवराव पाटील हे जखमी झाले आहेत.